# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे — ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक:०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय:—** **''दिनांक ०१ जानेवारी, २०२६ ते दिनांक १० जानेवारी, २०२६ या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी तसेच संचालनलयास प्राप्त झालेले अर्ज परिपूर्ण असावे याबाबत विशेष मोहिम राबविणेबाबत...''**

**संदर्भ :— १)** **मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांचे संदर्भ पत्र.क्र. महाडीबीटी—२०२५—२६/** (E-6617249/2025, **दि. ३१/१२/२०२५.**

**२)** **मा. संचालनालयाचे पत्र.क्र. उशिंस/शिष्य—२०२५—२६/डीबीटी/** 1990174, **दि. २९/१२/२०२५.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मा. संचालनालयाच्या संदर्भिय पत्रानुसार राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने महाडीबीटी पोर्टलद्वारे अंमलबजावणी करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५—२६ करीता महाडीबीटी पोर्टल वरून पात्र विद्यार्थ्यांकडून दि. ३०/०६/२०२५ पासून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत महाडीबीटी पोर्टवर संदर्भीय पत्र क्र. १ मधील एकूण १४ शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे.

महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी सहाय्य व्हावे तसेच महाविद्यालयातील लिपीक व प्राचार्य यांना अर्जांची पड़ताळणी करणेसाठी सहाय्य व्हावे यासाठी महाडीबीटी पोर्टलच्या संकेत स्थळावर https://mahadbt.maharashtra.gov.in यावर मॅन्युअल उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. सदर शिष्यवृत्तीबाबत किमान पात्रता अटी, आवश्यक कागदपत्रे, ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती आणि महाविद्यालय, संस्थेसाठी सूचना याबाबत सविस्तरपणे मा. संचालनालयाचे दि. ०७/०७/२०२५ व दि. २५/०९/२०२५ च्या तसेच शिक्षण सहसंचालक, पुणे यांच्या कार्यालयाचे दि. ०९/०७/२०२५ रोजीच्या परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आले आहे. तथापि अद्यापही अर्जांची संख्या खूप कमी असल्यामुळे आता विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरणेकरिता दि. ०१ जानेवारी, २०२६ ते १० जानेवारी, २०२६ या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी तसेच संचालनालयास प्राप्त झालेले अर्ज परिपूर्ण असावे याबाबत विशेष मोहिम राबविण्यात संदर्भ पत्र क्र. १ अन्वये कळविले आहे.

त्याप्रमाणे सदर विशेष मोहिमेचा संकलीत अहवाल दर महिन्याच्या १५ आणि ३० तारखेला मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांना तसेच मा. संचालनालयास सादर करण्यात यावा.

मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे या कार्यालयामार्फत विशेष मोहिमेच्या कालावधीत राज्य शासन पुरस्कृत योजनांची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. त्याकरीता ऑनलाईन गुगल मीट आयोजित केली आहे. सदर मिटींगची लिंक एक दिवस आधी

कळविण्यात येईल. सदर ऑनलाईन गुगल मीट साठी सर्व महाविद्यालय/संस्था यांचे नोडल अधिकारी यांनी आवर्जून उपस्थित राहण्यास कळविले आहे.

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

गणेशखिंड पुणे – ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/99 }
दिनांक : 02/०१/२०२६ }

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रत:
१. मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. विभागप्रमुख/मा. संचालक, सर्व शैक्षणिक विभाग/संकुल, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**17, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे 411 001**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – jdhepune.in

फोन नं . - 020-26127833 / 26051632 फॅक्स नं. 020-26051632

जा.क्र. महाडीबीटी-2025-26/(E-6617249/2025)/ दि नांक : 31.12.2025

प्रति,

1. प्राचार्य,
   सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
   कायम विना अनुदानित वरिष्ठ कला, वाणिज्य,
   विज्ञान, विधी, शिक्षण शास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
   पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
   तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
2. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
3. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
4. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
5. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
6. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
7. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
8. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

विषय – दि. 01 जानेवारी, 2026 ते 10 जानेवारी, 2026 या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी तसेच संचालानलयास प्राप्त झालेले अर्ज परिपूर्ण असावे याबाबत विशेष मोहिम राबविणेबाबत ..

संदर्भ : - मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं / शिष्य – 2025 – 26 / डीबीटी / 1990174 दि. 29.12.2025.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, मा. संचालनालयाच्या संदर्भिय पत्रानुसार राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने महाडीबीटी पोर्टलद्वारे अंमलबजावणी करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष 2025-26 करीता महाडीबीटी पोर्टल वरुन पात्र विद्यार्थ्यांकडून दि. 30.06.2025 पासून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत महाडीबीटी पोर्टलवर राबविण्यात येणाऱ्या खाली नमूद केल्याप्रमाणे 14 शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे.

| अनु.क्र. | योजनांची नावे |
|---|---|
| 1 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना |
| 2 | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| 3 | एकलव्य आर्थिक सहाय्य |
| 4 | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर) |
| 5 | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर) |
| | |

| | |
|---|---|
| 6 | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती |
| 7 | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| 8 | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| 9 | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| 10 | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| 11 | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| 12 | राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग-2) |
| 13 | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| 14 | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |

महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी सहाय्य व्हावे तसेच महाविद्यालयातील लिपीक व प्राचार्य यांना अर्जांची पडताळणी करणेसाठी सहाय्य व्हावे यासाठी महाडीबीटी पोर्टलच्या संकेत स्थळावर https://mahadbt.maharashtra.gov.in यावर मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. सदर शिष्यवृत्तीबाबत किमान पात्रता अटी, आवश्यक कागदपत्रे, ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती आणि विद्यापीठ, महाविद्यालय, संस्थेसाठी सूचना याबाबत सविस्तरपणे मा. संचालनालयाचे दि . 07.07.2025 व दि. 25.09.2025 च्या तसेच या कार्यालयाचे दि. 09.07.2025 रोजीच्या परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आले आहे. तथापि अद्यापही अर्जांची संख्या खूप कमी असल्यामुळे आता विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरणेकरीता दि. 01 जानेवारी, 2026 ते 10 जानेवारी, 2026 या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी तसेच संचालानलयास प्राप्त झालेले अर्ज परिपूर्ण असावे याबाबत विशेष मोहिम राबविण्यात यावी.

1. महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती निहाय आवश्यक कागदपत्रे अपलोड केली असल्याची खात्री करावी. तसेच संबंधित विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेली (अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासक्रमाचा प्रकार अनुदानित / विना अनुदानित अभ्यासक्रम कालावधी, प्रवेशाबाबतची माहिती (Admission details) टक्केवारी, शिष्यवृत्ती लाभ इ. काळजीपूर्व पडताळणी करणे आवश्यक आहे.)

2. महाविद्यालयाच्या लिपीकांनी त्यांचे लॉगीनवर आलेल्या ऑनलाईन अर्जावर तातडीने कार्यवाही ( Approve / Reject / Sent Back ) करावी. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होताच शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घेऊन पात्र अर्ज तसेच महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज संबंधित विभागाकडे विहित कालमर्यादेत पाठवावी.

3. महाविद्यालय स्तरावर दि. 01 जानेवारी, 2026 ते 10 जानेवारी, 2026 या कालावधीत विशेष मोहीम म्हणून साजरा करण्यात यावा. सदर मोहिमेमध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींचे समाधान महाविद्यालयातील शिष्यवृत्ती नोडल अधिकारी यांनी तात्काळ करावे.

4. मा. संचालनालयाच्या दि. 20.11.2025 रोजीच्या ऑनलाईन बैठकीमध्ये शिष्यवृत्ती अर्जाबाबत कळविण्यात आले होते की, महाविद्यालयांची वेतन देयकांसोबत शिष्यवृत्ती अर्जांच्या कार्यवाहीचा अहवाल सुध्दा घेण्यात येणेबाबत सूचित करण्यात आले होते. सदर सूचनेची काटेकोर अंमलबजावणी करावी.

5. दि. 01 जानेवारी, 2026 ते 10 जानेवारी, 2026 या कालावधीत विद्यार्थ्यांना राज्य शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांची सविस्तर माहिती देण्यात यावी व विद्यार्थ्यांकडून जास्तीत जास्त अर्ज भरुन घेऊन परिपूर्ण अर्ज मंजूरीकरीता सादर करावेत. तसेच सदर विशेष मोहिमेचा संकलीत अहवाल

दर महिन्याच्या 15 आणि 30 तारखेला या कार्यालयास तसेच मा. संचालनालयास सादर करण्यात यावा.

6. या कार्यालयामार्फत विशेष मोहिम अंतर्गत दि. 01 जानेवारी, 2026 ते 10 जानेवारी, 2026 या कालावधीत राज्य शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांची सविस्तर माहिती देण्यात येणार आहेत. त्याकरीता ऑनलाईन गुगल मीट आयोजित केली आहे. सदर मिटींगची लिंक एक दिवस आधी कळविण्यात येईल. सदर ऑनलाईन गुगल मीट साठी सर्व महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांचे नोडल अधिकारी यांनी आवर्जून उपस्थित रहावे.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 31-12-2025
18:37:12

(डॉ. अशोक उबाळे )
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

सोबत – महाविद्यालयाचे पत्र.